लोकमत

# शिवाजी विद्यापीठातील रोजंदारी कर्मचाऱ्यांचा पगार जमा

## दीडशे जणांना लाभ : विद्यार्थ्यांची होत होती उपासमार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रशासन व यशस्वी अकॅडमीच्या वादात गेला दीड महिना रखडलेला विद्यापीठातील १५० रोजंदारी कर्मचाऱ्यांचा पगार मंगळवारी सकाळीच या कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा झाला. या दोन संस्थांच्या वादात या कर्मचाऱ्यांची उपासमार होत असल्याचे व त्याकडे विद्यापीठ प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याचे वृत्त 'लोकमत'ने सोमवार (दि. ३०)च्या अंकात दिले होते. त्यामुळे विद्यापीठास जाग आली व त्यांनी संबंधित संस्थेची देय रक्कम दिल्यामुळे हा पगार झाला.

विद्यापीठाने केंद्र शासनाच्या नीम (एनईईएम-राष्ट्रीय रोजगार क्षमता मिशन) योजनेतून विद्यावेतनावर गेल्या जूनपासून यशस्वी अकॅडमी या पुण्याच्या खासगी कंपनीमार्फत लिपिक, अटेंडंट आणि शिपाई अशी सुमारे १५० पदे भरली आहेत. त्या सर्वांनाच प्रत्येकी ७६१६ एवढा पगार दरमहा दिला जातो. हे काम करणारे बहुतांश विद्यार्थीच आहेत व त्यातही मुलींची संख्या जास्त आहे. त्यांचे जादा कामासह थकीत असलेले सरासरी आठ हजार रुपये वेतन बँकेतील खात्यात जमा झाले. या कर्मचाऱ्यांचे एका महिन्याच्या वेतनाचे सरासरी १६ लाख रुपये होतात. विद्यापीठाने त्या कंपनीच्या जानेवारी व फेब्रुवारीच्या बिलांतील त्रुटी काढून तीन महिन्यांची बिले थकीत ठेवल्याने कंपनीने या कर्मचाऱ्यांचा फेब्रुवारीचा पगार मार्च संपला तरी दिला नव्हता. हा पगार एप्रिलशिवाय देऊ शकत नाही, असे कंपनी सांगत होती. कंपनीने वेळेत बिले सादर केलेली नाहीत, असे सांगून विद्यापीठाने हात वर केले होते. या कर्मचाऱ्यांतील बहुतांश विद्यार्थीच आहेत. त्यांच्यासाठीच ही योजना आहे. त्यांच्या हिताकडे लक्ष देऊन विद्यापीठाने पगार द्यायला भाग पाडायला हवे, अशी भूमिका 'लोकमत'ने मांडल्यानंतर हा पगार झाला आहे, अशी प्रतिक्रिया एका कर्मचारी महिलेने व्यक्त केली.

### 'लोकमत'च्या भूमिकेने न्याय



विद्यापीठाने पगार द्यायला भाग पाडायला हवे, अशी भूमिका 'लोकमत'ने मांडल्यानंतर हा पगार झाला, अन्यथा पगार कधी होणार हे सांगणे अवघड होते, अशी प्रतिक्रिया व्यक्त झाली.

# विद्यापीठाच्या सर्व परीक्षा स्थगित : गजानन पळसे

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबतची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली आहे.

कोव्हीड-१९ कोरोना या विषाणूचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासन पातळीवर विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचच एक भाग म्हणून राज्य शासनाने ३१ मार्चपर्यंत शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांना सुटी दिली होती, तर या काळातील परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्या.

दरम्यान, केंद्र सरकारतर्फे संपूर्ण देशात लॉकडाऊन करण्यात आले. त्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मार्च-एप्रिल २०२० मधील उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा दि. १४ एप्रिल, २०२० पर्यंत स्थगित करण्यात आल्या. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक, प्रात्यक्षिक आणि लेखी परीक्षा दि. १४ एप्रिलपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. तसेच स्थगित परीक्षेच्या फेरनियोजनाबाबतचा तपशील व स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर केले आहे, अशी माहिती ही गजानान पळसे यांनी दिली आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात कोरोना आयसोलेशन कक्षासाठी प्रयत्न

## आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली पाहणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे जिल्ह्यातील नागरिक भयभीत झाले आहेत. मात्र, जिल्हा प्रशासनाने 'कोरोना'चे युद्ध जिंकण्यासठी सर्व शस्त्रे तयार ठेवली आहेत. आरोग्य यंत्रणेनेदेखील कंबर कसली आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने वैद्यकीय सेवेसाठी सर्वतोपरी मदतीचा हात दिला आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला, तर खबरदारी म्हणून शिवाजी विद्यापीठातील मोठ्या इमारतींमध्ये आयसोलेशन कक्ष सुरू करण्याची तयारी जिल्हा प्रशासनाने सुरू केली आहे.

रविवारी आरोग्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यापीठाची पाहणी केली. सध्या आयसोलेशन कक्षात सुमारे दीडशे बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. येथील काही रूग्णालयांत २३१ रूग्णांवर कोरोनाची प्राथमिक तपासणी करून वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवले आहे. कोरोनाच्या रूग्णसंख्येत वाढ झाल्यास खबरदारी म्हणून शिवाजी विद्यापीठातील मोठ्या इमारतींमध्ये बेडसह सुसज्ज आयसोलेशन सुरू करण्याच्या विचारात जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभाग आहे. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विद्यापीठातील

पुढारी

# 'विद्यापीठाच्या शिक्षक, कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री निधीस द्यावे'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना (कोविड-१९) या विषाणूमुळे देशात उद्‌भवलेली अभूतपूर्व चिंताजनक परिस्थिती लक्षात घेता या रोगाविरुद्ध लढण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक, प्राचार्य, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक दिवसाचे वेतन देऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

कोरोनामुळे केवळ संपूर्ण जग अभूतपूर्व व अदृश्य अशा संकटाचा सामना करीत आहे. या संकटावर मात करण्यासाठी सार्वजनिक संपर्क टाळणे व घरातच थांबणे हा एकमेव उपयुक्त उपाय आहे. खबरदारीचा पर्याय म्हणून देशात टप्प्याटप्प्याने करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सर्वच उद्योग-व्यवसाय ठप्प झाले आहेत. त्यामुळे देशाची आर्थिक चाके थांबली आहेत. त्याचप्रमाणे संशयित व बाधित रुग्णांवर काळजीपूर्वक उपचार करण्यासाठी स्वतंत्र क्वारंटाईन यंत्रणा उभारण्याचीही गरज आहे. सामाजिक दायित्वाच्या भावनेतून विद्यापीठाशी संबंधित घटकांनी वाटा उचलणे गरजेचे आहे.

# एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री निधीस द्या

## कुलगुरू देवानंद शिंदे यांचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोनामुळे देशात उद्भवलेली अभूतपूर्व चिंताजनक परिस्थिती लक्षात घेता या रोगाविरुद्ध लढण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक, प्राचार्य, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक दिवसाचे वेतन देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.



कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केलेल्या आवाहनानुसार, कोरोनामुळे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण जग एकाच संकटाचा सामना करत आहे. या संकटावर मात करण्यासाठी सार्वजनिक संपर्क टाळणे आणि घरातच थांबणे हा एकमेव उपाय आहे. खबरदारीचा पर्याय म्हणून देशात टप्प्याटप्प्याने करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सर्वच उद्योग-व्यवसाय ठप्प झाले आहेत. त्यामुळे देशाची आर्थिक चाके थांबली आहेत. त्याचप्रमाणे संशयित व बाधित रुग्णांवर अत्यंत काळजीपूर्वक उपचार करण्यासाठी स्वतंत्र क्वॉरंटाईन यंत्रणा उभारण्याचीही गरज असून त्यासाठी आर्थिक निधी आवश्यक आहे. या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये सामाजिक दायित्वाच्या भावनेतून विद्यापीठाशी संबंधित घटकांनी आपला वाटा उचलणे आवश्यक आहे. यासाठी आपण आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीला देऊन आपलाही खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन कुलगुरू शिंदे यांनी केले आहे.

# कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठाच्या स्वनिधीतून

कोल्हापूर : करोना विषाणू संसर्ग अशा पार्श्वभूमीवर राज्यभरात संचारबंदी लागू असल्याचा परिणाम आता विविध क्षेत्रातील नोकरदारांचे वेतन लांबणीवर पडण्यावर होणार आहे. याच पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या स्वनिधीमधून ५५० कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठ फंडातून ८०० हून अधिक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन केले जाते यापैकी साडेपाचशे कर्मचाऱ्यांचे वेतन विद्यापीठ फंडातून करण्यात येणार आहे.

## थोडक्यात

### एक दिवसाचे वेतन सहायता निधीला द्यावे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी करोना विषाणू संसर्ग पार्श्वभूमीवर वैद्यकीय उपचारांना आर्थिक बळ मिळावे, यासाठी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी द्यावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ .देवानंद शिंदे यांनी केले आहे. यामध्ये मान्यताप्राप्त संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर अधिकारी आणि कर्मचारी तसेच, विद्यापीठ अधिविभागांचे विभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक आणि सर्व प्रशासकीय अधिकारी, सेवक यांनी सहभाग द्यावा, असे या परिपत्रकात म्हटले आहे. विद्यापीठाने विद्यापीठात शिव आपत्ती व्यवस्थापन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करून आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू केली आहे.

लोकमत

# एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री निधीस द्यावे : कुलगुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक, प्राचार्य, प्रशासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री साहाय्यता निधीसाठी एक दिवसाचे वेतन देऊन सामाजिक बांधीलकी जपावी, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सोमवारी केले.

कुलगुरु डॉ. शिंदे यांनी केलेल्या आवाहनानुसार, कोरोनावर मात करण्यासाठी सार्वजनिक संपर्क टाळणे आणि घरातच थांबणे हा एकमेव उपयुक्त उपाय आहे. लॉकडाऊनमुळे सर्वच उद्योग, व्यवसाय ठप्प झाले आहेत. संशयित व बाधित रुग्णांवर काळजीपूर्वक उपचार करण्यासाठी स्वतंत्र क्वारंटाईन यंत्रणा उभारण्याचीही गरज आहे; त्यासाठी आर्थिक निधीची गरज आहे. या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये सामाजिक दायित्वाच्या भावनेतून विद्यापीठाशी संबंधित घटकांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री साहाय्यता निधीला देऊन आपलाही खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन कुलगुरूंनी केले आहे.

# जिल्हा प्रशासनाकडून वसतिगृहाची माहिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील तीन हजार विद्यार्थ्यांना घरी पाठवण्यात आले आहे. ज्यांच्याकडे गावी परतण्यासाठी वाहनांची सोय नाही अशा ४० विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्यास परवानगी दिली आहे. संभाव्य धोका ओळखून कोरोना वॉर्डसाठी विद्यापीठातील वसतिगृहाची जिल्हा प्रशासनाने माहिती घेतली असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले. विद्यापीठातील वसतिगृहात जवळपास ३०० खोल्या असून यामध्ये तीन हजार विद्यार्थी राहतात.